महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

# Maharashtra Water Resources Regulatory Authority
(MWRRA)

9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cufffe Parade, Mumbai - 400005. Tel.: 2215 2019 Fax.: 2215 3765 E-mail: mwrra@mwrra.org

No. MWRRA/legal/2015/case No.10 of 2015/**753** Date: 21/12/2015

**CASE NO.10 OF 2015**

**In the matter of Releasing Water from Kukadi Project into Sina Dam**

**Adv. Shivaji Maruti Anbhule**

**Vs**

**Secretary (WRM& CAD), Water Resources Department and others**

Please find herewith a copy of MWRRA Order dated 21/12/2015 in the matter.

Encl : As above

**(Dr. Suresh Kulkarni)**
**Secretary**

Copy for information and necessary action to:

1. Secretary, (WRM & CAD) Water Resources Department, Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chawk, Mantralaya, Mumbai - 400032.
2. Executive Director, Maharashtra Krishna Valley Development Corporation, Sinchan Bhavan, Barane Road, Mangalwar Peth, Pune - 11.
3. Chief Engineer, (Specified Projects), Water Resources Department, Sinchan Bhavan, Barne Road, Mangalwar Peth, Pune - 411 011.
4. Supreintending Engineer & Administrator, CADA, Sinchan Bhavan, Barne Road, Mangalwar Peth, Pune - 411 011.

**Copy for information to:**

1. Adv. Shivaji Maruti Anbhule At - Post Ghumari Taluka Karjat District Ahmednagar - 414 001 through Adv. G. M. Dhere
2. Shri. Babanrao Pachpute, Mauli Nivas, Shrigonda, Dist. Ahmednagar.
3. Adv. Manikarao Namdeo More, Ahmednagar,
4. Shri Milind Bagal, President, Swaraj Foundation of Water Karjat, Dist. Ahmednagar
5. Adv. Kailash Shevale, At-Post & Tal. Karjat, Dist. Ahmednagar

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

Maharashtra Water Resources Regulatory Authority
(MWRRA)

9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cufffe Parade, Mumbai - 400005. Tel.: 2215 2019 Fax.: 2215 3765 E-mail: mwrra@mwrra.org

**CASE NO.10 OF 2015**

**In the matter of Releasing Water from Kukadi Project into Sina Dam**

**Adv. Shivaji Maruti Anbhule** **Petitioner**

**Vs**

1. Secretary, (WRM & CAD) Water Resources Department, Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chawk, Mantralaya, Mumbai – 400032.
2. Executive Director, Maharashtra Krishna Valley Development Corporation, Sinchan Bhavan, Barane Road, Mangalwar Peth, Pune – 11.
3. Chief Engineer, (Specified Projects), Water Resources Department, Sinchan Bhavan, Barne Road, Mangalwar Peth, Pune – 411 011.
4. Superintending Engineer & Administrator, Command Area Development Authority, Sinchan Bhavan, Barne Road, Mangalwar Peth, Pune – 411 011

**Respondents**

**ORDER**

**CORAM : SHRI. RAVI B BUDHIRAJA, CHAIRMAN**
**SMT. CHITKALA ZUTSHI, MEMBER (Economy)**

**Date: 21 December 2015**

An application was received from Adv. Shivaji Maruti Anbhule, resident of Ghumari, Taluka Karjat, District Ahmednagar through Adv. G.M.Dhere vide his application dated 29/10/2015. He has stated that the

M.W.R.R.A. MUMBAI

scanty rainfall during the monsoon of 2015 in the catchment of Sina project located in Karjat Taluka of Ahmednagar District has led to a drought like situation and there is no drinking water for farmers and livestock. He has sought that the quota be decided for drinking & irrigation use and the equitable distribution of water be decided as per MWRRA Act 2005 by way of release of water from Kukadi complex through Bhosekhind tunnel into Sina Dam. The Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA) has conducted a hearing on 04/12/2015 to hear all parties.

## 2 Hearing on 04/12/2015

a) During the hearing following persons submitted their applications for intervening in the matter and the Authority accepted their applications as Intervenors.

   (i) Shri.Babanrao Pachpute, Ex. Minister

   (ii) Adv. Manikarao Namdeo More representing on behalf of 22 Gram Panchayats of Ashti Taluka Dist. Beed & 21 Gram Panchayats of Tal. Karjat of Dist. Ahmednagar

   (iii) Adv. Kailash Shevale and Milind Dattaray Bagal

b) The Petitioner's Advocate G M Dhere, above Intervenors and Shri. K. B. Kulkarni, S. E. & Administer, CADA Pune from the Respondent's side were present at the time of the hearing

c) The Authority heard the plea of the Petitioner & Intervenors who narrated their demands regarding releasing water from upstream projects that is the Kukadi complex through Bhosekhind tunnel into Sina Dam.

d) Shri. K B Kulkarni stated that the Sina Dam is on the Sina River. The Kukadi Complex and Sina Dam are in different sub-basins. Therefore water cannot be transferred from one basin to another into Sina dam. As per the MKVDC's administrative approval to Sina Medium Project along with Bhosekhind Tunnel dated 20/11/2000 (**Annex - I**), only flood water from Kukadi complex can be released into Sina dam through Bhosekhind tunnel during the flood period, not in a normal or scarcity condition.

M.W.R.R.A. MUMBAI

**3. Direction**

i) Having heard the background of the matter and preliminary arguments, the Authority feels that this matter should be first examined by the Chief Engineer (Specified Projects), Pune as the Primary Dispute Resolution Officer (PDRO) vide Section 22(1) of the MWRRA Act and as per the WRD, GR dated 25/08/2009. The copy of GR is enclosed as **Annex - II**

ii) The PDRO has to follow the procedure for hearing the dispute as per the procedure laid down in MWRRA (Conduct of Business) Regulations 2013.

With the above findings and directions, the petition and the applications stand disposed of.

| | |
|---|---|
| **Sd/-** | **Sd/-** |
| **(Chitkala Zutshi)** | **(Ravi B Budhiraja)** |
| **Member (Economy)** | **Chairman** |

**(Dr. Suresh Kulkarni)**
**Secretary**

M.W.R.A. MUMBAI

ANNEX - I

४०७
2000

सीना मध्यम प्रकल्प - भोसेखिंड बोगद्यासह तालुका-कर्जत जिल्हा अहमदनगर सुधारित प्रशासकीय मान्यता

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

मकृखोविम निर्णय क्र. मकृखोविम/सीमप्र/सुप्रमा/मप्र-४/२९९/(३३१/९९)/११९३७
दि.२०.११.२०००

संदर्भ : १. शासन पत्र निर्णय क्र. पीएलएन५२६६/२८३००-(२) दि.२१.१२.१९७२

२. शासन निर्णय क्र. एसआयएन१०७६/टी-१० दि.१५.०९.१९७६

३. शासन पत्र क्र. कृखोविम/सुप्रमा/सा-२०१०/(३५९/२०००)/मोप्र-१
दि.०७.११.२०००

**प्रास्ताविक :**

उपरोक्त संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयाद्वारे रु.३७२.६३ लक्ष एवढ्या अंदाजित खर्चाच्या सीना मध्यम प्रकल्प ता. कर्जत जि. अहमदनगर या पाटबंधारे प्रकल्पाला शासनाने मूळ प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानुसार या प्रकल्पाद्वारे अहमदनगर जिल्ह्यातील ७७८३ हेक्टर व बीड जिल्ह्यातील ६६२ हेक्टर असे एकूण ८४४५ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ अपेक्षित होता.

प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम १९७२ मध्ये सुरु करण्यात आले आहे. त्यानंतर या कामाच्या अधिक्य टिपणीस शासनाने सन १९७६ मध्ये संदर्भ क्र.२ मधील आदेशान्वये मान्यता दिलेली आहे.

सन १९८५ मध्ये प्रकल्प पूर्ण झाला व त्याच वर्षी त्या धरणात पाणीसाठा करण्यात आला. मूळ मंजूर प्रकल्प अहवालात फक्त उजवा कालवाच प्रस्तावित होता. तथापि सततच्या लोक प्रतिनिधींच्या मागण्यांना अनुसरुन डाव्या कालव्याचा समावेश प्रकल्पात नव्याने अंतर्भूत करण्यात आला. त्याचप्रमाणे त्यामध्ये सीना धरणाची उंची २.५६ मीटर पर्यंत वाढवून प्रकल्पीय सिंचनक्षमता वाढविण्याचा समावेश केला गेला.

सीना मध्यम प्रकल्प सन १९८२ पासून युएसएआयडी या बाह्यसहाय्यासाठी प्रस्तावित केला गेला. त्या अंतर्गत असलेल्या शर्तीप्रमाणे रु.२०६५.८० लक्ष एवढ्या रकमेच्या मुल्यांकन अहवालास मान्यता प्राप्त झाली आहे. यामध्ये युएसएआयडी च्या मानकाप्रमाणे प्रकल्पातील भूविकास भाग-१, जलनिस्सारणाची कामे, कालव्याला निवडक ठिकाणी अस्तरीकरणाचा समावेश होता.

सीना मध्यम प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठीचा अहवाल प्राप्त होताच, त्यामध्ये कुकडी डाव्या कालव्याच्या किमी १६७ मधून भोसेखिंड मार्गे १.२ अब्ज घनफूट पाणी सीना मध्यम प्रकल्पात सोडण्यासाठीच्या (पैकी ०.७ अब्ज घनफूट पाणी सीना धरणात व ०.५ अब्ज घनफूट पाणी मेहेकरी मध्यम [illegible]) कामाचा खर्च अंतर्भूत करण्याचे प्रस्तावित करण्यात

M.W.R.R.A.
MUMBAI

आले आहे. या बोगद्यामुळे सीना व मेहेकरी या दोन्ही मध्यम प्रकल्पामधील पाणीसाठ्याचा स्त्रोतवृद्धीचा प्रयत्न केला जाणार आहे.

**महामंडळाचा निर्णय :**

सीना मध्यम प्रकल्पासह (भोसेखिंड मार्ग) कुकडी प्रकल्पाच्या पाणीवापरामधून पुराचे अतिरिक्त पाणी सीना धरणांत व त्यानंतर सीना धरणातून पाणी पुढे मेहेकरी मध्यम प्रकल्पात सोडण्याच्या रु.११८.९४ कोटी (एकशे अठरा कोटी चौऱ्याण्णव लक्ष रुपये) (दरसूची १९९९-२०००) एवढ्या अंदाजित खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजित खर्चाची शीर्ष निहाय, उपशीर्षनिहाय तरतूद दर्शविणारा तपशील सोबतच्या परिशिष्टामध्ये देण्यात आलेला आहे.

सुधारित प्रशासकीय मान्यतेअंतर्गत रु.११८.९४ कोटींपैकी रु.३०.०० कोटी हा खर्च वरील पाणी वापराचे प्रमाणात मेहेकरी मध्यम प्रकल्पावर भोसेखिंड प्रणालीच्या एकूण खर्चामधील असेल. या भोसेखिंड प्रणालीचा सीना मध्यम प्रकल्पांवरील खर्च रु.५३.०४ कोटी एवढा असेल. उर्वरित खर्च. रु.३५.९० कोटी हा मूळ सीना मध्यम प्रकल्पावरील आहे. सीना मध्यम प्रकल्पावर भोसेखिंड बोगद्याच्या एकूण खर्चापैकी फक्त रु.५३.०४ कोटी इतका खर्च वर्ग होत असल्याने या खर्चाच्या मर्यादेबाहेर खर्च जाण्यापूर्वी मेहेकरी मध्यम प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रकास बोगद्याचे रु.३० कोटी इतक्या खर्चासह मान्यता घेणे बंधनकारक राहील.

ह्या प्रकल्पामुळे सीना प्रकल्पामधील अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे ७७८३ हेक्टर व बीड जिल्ह्यातील सुमारे ६६२ हेक्टर असे एकूण ८४४५ हेक्टर क्षेत्रास शाश्वतरित्या सिंचन होणे शक्य होणार आहे.

सीना मध्यम प्रकल्पावरील खर्चास जरी उपरोक्त प्रमाणे मान्यता दिलेली असली तरी ही प्रकल्पावर खर्च करताना खालील मार्गदर्शक तत्वाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(अ) इमारती (रु.०.२५ कोटी तरतूद) बांधण्यावर खर्च करु नये.

(ब) एम-वनीकरण (रु.०.०७ कोटी), ओ-संकीर्ण(रु.०.०५ कोटी), पी-देखभाल (रु.०.०५ कोटी), क्यु-विशेष हत्यारे व संयत्रे (रु.०.२५ कोटी), आर-दळणवळण (रु.०.३६५९ कोटी) या तरतुदी खर्चापूर्वी त्याचे सविस्तर प्रस्तावास महामंडळाची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

(क) केंद्र शासनाने घातलेल्या पर्यावरण विषयक अटींची पूर्तता करवी.

या प्रकल्पावरील खर्च (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूक(१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (संगणक संकेतीक क्र. (४७०१ एच २०-८) अंतर्गत सीना मध्यम प्रकल्प या मुख्य लेखा शीर्षाखाली टाकावा. या कामासाठी महामंडळाकडून आर्थिक तरतूद करून घेऊनच व प्रापणसूचीस मान्यता घेऊनच मंजुर अनुदानाच्या व मर्यादेच्या अधीन राहून खर्च करण्यात यावा.

M. W. R. R. A.
MUMBAI

हा निर्णय महामंडळाच्या नियामक मंडळाच्या दि.२३.०८.२००० रोजीच्या २१ व्या बैठकीतील ठराव क्र.२१/३ अन्वये दिलेल्या नियामक मंडळाच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

हा निर्णय मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

या प्रकल्पास प्रदान केलेली सुधारित प्रशासकीय मान्यता क्र. (मध्यम प्रकल्प) सुप्रमा 407/2000 अनुक्रमांकावर नोंदवण्यात आलेली आहे.

**सोबत :** वरील प्रमाणे

परिशिष्ट पृष्ठ १ ते ३

म.कृ.खो.वि.म. करिता,

**कार्यकारी अभियंता**

1 DEC 2000

प्रत माहितीसाठी

१. मा. सचिव (पा), पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. सचिव (लाक्षेवि), पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई
३. वित्त विभाग (व्यय-६) मंत्रालय, मुंबई
४. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महसूल व वन विभाग, र-६ कार्यासन, मंत्रालय, मुंबई
७. अवरसचिव, जसंअ, मंत्रालय, मुंबई
८. मा. उपसंचाल, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व उप सचिव महसूल व वन विभाग
९. मा. आयुक्त पुणे/नाशिक/औरंगाबाद
१०. मा. जिल्हाधिकारी नगर/बीड
११. मा. महासंचालक माहिती व प्रसिद्धी संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१२. स्वीय सहाय्यक, पाटबंधारे मंत्री (कृखो)
१३. स्वीय सहाय्यक, पाटबंधारे राज्यमंत्री (कृखो)
१४. मुख्य अभियंता (विप्र), पाटबंधारे विभाग, पुणे
१५. मुख्य अभियंता (पा), पाटबंधारे विभाग, पुणे
१६. अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, पुणे
१७. अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे
१८. अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे
१९. अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद

M.W.R.R.A. MUMBAI

ANNEX - II

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम २२ (१) नुसार राज्यातील प्रत्येक नदी खोरे अभिकरणाकरिता प्राथमिक विवाद निवारण अधिकारी प्राधिकृत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १००९/ २६५/ ०९/ सिंव्य धो
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक - २५ ऑगस्ट, २००९

संदर्भ - शासन निर्णय क्रमांक एसयुटी २००९/ ७६/ ०९/ सिंव्य धो, दिनांक १५-७-२००९.

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्यामधील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे कुशल, समन्यायी व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्यांची सुनिश्चिती करण्याकरिता, कृषीविषयक, औद्योगिक, पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी, वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ अन्वये, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे.

या अधिनियमाच्या कलम २ (प) नुसार, नदी खोरे अभिकरण म्हणून, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांना विनिर्दिष्ट करण्यात आले आहे.

या अधिनियमाच्या कलम १३ नुसार, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण व विवाद सोडविणाऱ्या अधिकाऱ्यास, विशिष्ट बाबींच्या संबंधात, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाने विहित केले असतील असे अधिकार आहेत.

या अधिनियमाच्या कलम २२ (१) नुसार, राज्य शासनास, पाण्याचे हक्क देण्याच्या किंवा त्याचे वितरण करण्याच्या संदर्भातील विवाद मिटविण्यासाठी, प्राथमिक विवाद निवारण अधिकारी म्हणून, प्रत्येक नदी खोरे अभिकरणाकरिता विहित केल्यानुसार, कोणताही एक किंवा अनेक सक्षम अधिकारी प्राधिकृत करता येऊ शकतात.

या अधिनियमाच्या कलम २२ (३) नुसार, प्राथमिक विवाद निवारण अधिका-याच्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्याकडे अपील दाखल करता येऊ शकते.

राज्यातील प्रत्येक नदी खोरे अभिकरणाकरिता, प्राथमिक विवाद निवारण अधिकारी प्राधिकृत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय -

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम २२ (१) नुसार, राज्यातील प्रत्येक नदी खोरे अभिकरणासाठी पुढीलप्रमाणे प्राथमिक विवाद निवारण अधिकारी प्राधिकृत करण्यात येत आहेत.

FILENAME \p C:\DOCUME~1\CHAVAN~1\Desktop\~6612930.doc

M. W. R. R. A.
MUMBAI

| अ. क्र. | खोरे | प्राथमिक विवाद निवारण अधिकारी | विवाद निवारणासाठी कार्यक्षेत्र | जिल्हे |
|---|---|---|---|---|
| १ | गोदावरी (उर्ध्व) | मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, जलसंपदा विभाग, नाशिक | गोदावरी खोरे (पैठणपर्यंत व वैनगंगा उपखोरे वगळून) | नाशिक, अहमदनगर (अंशतः) औरंगाबाद (अंशतः) |
| २ | गोदावरी (निम्न) | मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, औरंगाबाद | पैठणपासून राज्य सीमेपर्यंत (वैनगंगा उपखोरे वगळून) | औरंगाबाद (अंशतः), बीड, जालना, परभणी, नांदेड, लातूर |
| ३ | वैनगंगा (नागपूर) | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर | नागपूर प्रदेशातील वैनगंगा खोरे | नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया |
| ४ | वैनगंगा (अमरावती) | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती | अमरावती प्रदेशातील वैनगंगा खोरे, अमरावती प्रदेशातील तापी खोरे | अमरावती, यवतमाळ, वर्धा, अकोला, वाशिम, हिंगोली, बुलडाणा |
| ५ | कृष्णा | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे | कृष्णा (मुख्य खोरे), कोयनेसहित उपनद्या, भीमा उपखोरे पुण्यापर्यंत | पुणे शहर, पुणे जिल्हा, (अंशतः), सातारा, सांगली, कोल्हापूर |
| ६ | भीमा | मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, पुणे | नीरा, कुकडी यासह भीमा खोरे पुण्यापासून राज्य सीमेपर्यंत | पुणे (अंशतः), अहमदनगर, (अंशतः), सोलापूर, उस्मानाबाद |
| ७ | तापी | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव | तापी खोरे (अमरावती प्रदेशातील तापी खोरे वगळून) | जळगाव, नंदुरबार, धुळे |
| ८ | कोकणातील पश्चिम वाहिनी नद्यांची खोरी | मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, जलसंपदा विभाग, मुंबई | कोकणातील लहान मोठी २२ खोरी | ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००९०८२५१७३९०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( च.आ.बिराजदार)
मुख्य अभियंता (पाटबंधारे) व सह सचिव

FILENAME \p C:\DOCUME~1\CHAVAN~1\Desktop\~6612930.doc

M.W.R.R.A. MUMBAI

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव.
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
खाजगी सचिव, मा. मंत्री जलसंपदा (मकृखोविम वगळून), मंत्रालय, मुंबई.
खाजगी सचिव, मा. मंत्री जलसंपदा (मकृखोविम), मंत्रालय, मुंबई.
सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.
सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग.
सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
सर्व महासंचालक, जलसंपदा विभाग.
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
कार्यासन सिंव्य धो संग्रहार्थ.

M. W. R. R. A.
MUMBAI

FILENAME \p C:\DOCUME~1\CHAVAN~1\Desktop\~6612930.doc